।। श्रीगणेशायनम: ।।

।। श्री दत्त कृपा ।।

हॉटेल बळीराजा

बळीराजा AGRO RESORT

फॅमिली गार्डन रेस्टॉरंट अँण्ड फास्ट फूड

* साऊथ इंडियन
* पंजाबी * चायनीज
* तंदूर * महाराष्ट्रीयन

नाष्टा व जेवणाची उत्तम सोय

संपर्क : 8999854954, 8668738334

पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड



सायं. दैनिक

बीड

# प्रारंभ

Email-prarambh2023@gmail.com

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे



हॉटेल गौरव

Hotel Gaurav

रेस्टो बार, डिलक्स रूम

एसपी ऑफिससमोर, बार्शी रोड, बीड

प्रो.प्रा.नितीन खोड

एक वेळ आवश्य भेट द्या



बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक १५५ शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५ RNI MAHMAR/2021/81481 किंमत ३ रुपये ■पाने-४


# ईडीसारख्याच धाडी टाका, पंकजा मुंडेंकडून प्रदूषण नियंत्रण मंडळाला सूचना; एसटीपी प्लांटवर कारवाईचे आदेश



प्रारंभ । वृत्तसेवा

मुंबई : ईडी वैगेरे कशा धाडी टाकतात, तशा प्रदूषण नियंत्रण मंडळाने एसटीपी प्लांटवर धाडी टाका. प्रक्रिया करून पाणी नदीत सोडले जाते की नाही ते बघा, अशा सूचना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक जिल्ह्यातील उद्योजक आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक पार पडली. उद्योजकांच्या समस्या, प्रदूषण वाढीची कारणे आणि उपाययोजनासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीत पंकजा मुंडे म्हणाल्या की, एका देशाने कचरा केला तर इतर देशांनी करायला पाहिजे का? आता ग्लोबल प्रश्न निर्माण झाला आहे. उद्योगाला जपून पर्यावरण रक्षण करायचे. रेड झोनसारख्या वेगवेगळ्या झोनमध्ये प्रदूषण कमी करणे हे महत्वाचे काम आहे. आपण जेवढे पाणी वापरतो, त्यापैकी ४८ टक्के पाणी ट्रीट करतो. ५२ टक्के पाणी वाया जाते. पंतप्रधान मोदींच्या लक्षात आल्यानंतर नमामी गंगासारखे उपक्रम सुरू केले. तुम्ही उद्योग सुरू करतात, त्यामुळे तुम्हाला सर्व सुविधा पाहिजे ही अपेक्षा असते. उद्योग विभाग आणि पर्यावरण विभाग यांची जबाबदारी आहे. आधी जबाबदारी उद्योग विभागाची आहे, प्रदूषण झाल्यानंतर आमचे काम सुरू होते. प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी जे प्रकल्प उभे करायचे, त्यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करू. काही उद्योग विभागाकडून करावे लागतील. पर्यावरण खात्याला स्वतःचा निधी नाही, असे त्यांनी म्हटले.

## मागे मी मंत्री झाले तेव्हा कुंभमेळा भरला, आता पुन्हा...

ईडी वैगेरे कशा धाडी टाकतात, तशा प्रदूषण नियंत्रण मंडळाने एसटीपी प्लांट धाडी टाका, प्रक्रिया करून पाणी नदीत सोडले जाते की नाही ते बघण्याच्या सूचना पंकजा मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. सीएसआर फंडातून जसे मंदिर, शिक्षणासाठी पैसे उभे करतात, तसे तुम्ही पर्यावरणासाठी निधी उभा करावा. साधू-महंत जिथे डुबकी मरतील ते पाणी स्वच्छ असले पाहिजे. खूप लोक इथे कुंभमेळा काळात येतील. त्यामुळे स्वच्छतेसाठी शाश्वत उपाययोजना केल्या पाहिजेत. या कुंभमेळ्याला खूप लोक येतील. मागे मी मंत्री झाले तेव्हा कुंभमेळा भरला होता. आता पुन्हा मंत्री झाले आणि पुन्हा कुंभमेळा भरतोय, असे देखील पंकजा मुंडे यांनी म्हटले.

# कृष्णा आंधळेचा खून, वाल्मिक कराडने २५ जणांची हत्या केली, माझ्याकडे पुरावे; बडतर्फ पीएसआयचा खळबळजनक दावा

बीड । प्रतिनिधी

**'वाल्मीक कराडने परळीमध्ये कमीत-कमी २५ जणांची हत्या केली आहे, आता आणखी एका १४ वर्षीय मुलाचा खून झाला आहे', असा धक्कादायक दावा बडतर्फ पीएसआय रणजीत कासले यांनी व्हिडीओच्या माध्यमातून केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे कुठे आहे, त्याचा खून झाली आहे की काय? असेही कासले यांनी म्हटले.**



'मला दिल्लीतील एका लॉजमधून उचलण्यात आलं. गृहमंत्र्यांनी बोलावलंय, माझ्या जीवाला धोका आहे असे सांगून मला अटक करण्यात आली. माझ्या बॅगा गायब झाल्या. त्यातील पेपर गायब झाले. त्यातील पुरावे, पेन ड्राईव्ह सगळं काढून घेतलं. त्यामध्ये परळीतील कांडाचे पुरावे होते. फरार कृष्णा आंधळेचे देखील पुरावे होते. कृष्णाचा खून झाला आहे की काय? हे सगळं आता मी पुराव्यानिशीच बोलणार आहे. सरकारने माझे खोटे गुन्हे परत घेतले, तर मी पुरावे द्यायला तयार आहे', असे रणजीत कासले म्हणाले आहेत.

'वाल्मीक कराडने परळीत कमीत-कमी २५ जणांची हत्या केल्या आहेत. काहीचे तुकडे करुन नदीमध्ये, तळ्यामध्ये टाकले असतील, काहींना बॉयलरमध्ये टाकले असेल. तो मला आजही त्रास देतोये, जेलमधून फोन करतोय. माझ्याकडे आणखी एका हत्येचे पुरावे आहेत, जे मी दुसऱ्या व्हिडीओमध्ये तुम्हाला दाखवेन. एका १४ वर्षांच्या मुलाची हत्या कशाप्रकारे झाली, ते दाखवतो. फोटो आहेत माझ्याकडे', असा दावा बडतर्फ कासले यांनी केला आहे.

रणजीत कासले व्हिडीओमध्ये म्हणाला, 'महादेव मुंडे हत्या प्रकरणादरम्यानचं एसपी आणि वाल्मीक कराडचे कॉल डिटेल्स चेक करा. तेव्हा कळेल खरा आरोपी कोण आहे. तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर आणि वाल्मीक कराडचे दिवसातून दहा कॉल व्हायचे. एसपी ऑफिस आणि पोलीस स्टेशन वाल्मीक कराड चालवायचा. सायबर टीमधल्या कोळी मॅडमसोबतच्या कॉल रेकॉर्डिंगमध्ये तो म्हणतोय मी बाप आहे यांचा. बघा त्याची दहशत आणि तो किती विकृत होता ते.'

# आष्टी तालुक्यात हॉटेलवर काम करणाऱ्या कामगाराचा संशयास्पद मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

**मागील एक महिन्यापासून तालुक्यातील खडकत येथील एका हॉटेलवर कामगार असलेल्या एकाचा शुक्रवारी सकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान मृत्यु झाला होता. मृत्यु संशयास्पद असल्याने कुटुंबासह, नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यासाठी शनिवारी पोलिस अधिक्षक कार्यालयात ठाण मांडून बसले होते. यासंदर्भात पोलीसांनी योग्य ती कारवाई करावी अशी मागणी सुद्धा नातेवाईकांकडून होत आहे.**



आष्टी तालुक्यातील खडकत येथील एका हॉटेलवर मागील एक महिन्यापासून जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील धेनटाकळी येथील सिताराम रखमाजी ढवळे (४०) हे कामगार म्हणून कामाला होते. शुक्रवारी सकाळी सहा ते सातच्या दरम्यान त्यांचा हॉटेलवरील वरच्या मजल्यावरून पडून मृत्यु झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, कुटुंबातील सदस्य व नातेवाईकांनी हा मृत्यु संशयास्पद असून खुनाचा गुन्हा दाखल करावा. तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका घेतल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबातील सदस्य व नातेवाईक बीड येथे पोलिस अधीक्षकांकडे गेले असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणून ठाण मांडून बसले आहेत.घटनास्थळी आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, पोलिस हवालदार प्रवीण क्षीरसागर, हनुमान घाडगे, भरत गुजर, बिभीषण गुजर, चालक भाग्यवंत यांनी भेट देऊन पंचनामा केला आहे. आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतदेहावर आष्टी ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून मृतदेह ताब्यात न घेतल्याने आष्टी येथील शवगृहात ठेवण्यात आले आहे.

# तुळजाभवानी मंदिरातील शस्त्र पूजनाची तलवार गहाळ

## होम हवन करून देवीची शक्ती तलवारीमध्ये काढली; पुजाऱ्यांचा खळबळजनक आरोप

धाराशिव । प्रतिनिधी

श्री तुळजाभवानी मंदिरातील शस्त्र पूजनाची तलवार गहाळ झाल्याचा आरोप पुजाऱ्यांनी केला आहे. मंदिर संस्थानच्या खजाना खोलीतील तलवार गायब झाली असून ती तलवार मंदिराच्या बाहेर असल्याचा दावा हि मंदिराच्या पुजाऱ्यांनी केला आहे. तसेच मंत्रोपचाराने तुळजाभवानी देवीच्या आठ आयुधातील तत्व आणि शक्ती तलवारीमध्ये काढून तलवार गायब केल्याचा खळबळजनक आरोप हि पुजाऱ्यांकडून करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे सध्या तुळजाभवानी मंदिर प्रशासनामध्ये खळबळ उडाली असून तलवारी बाबत माहिती घेऊन सांगतो म्हणत मंदिर संस्थानने सावध भूमिका घेतल्याचे बघायला मिळत आहे.





पूजा करून शस्त्रातील तत्त्व आणि शक्ती तलवारीमध्ये टाकल्याचा पुजाऱ्यांचा दावा

पुढे आलेल्या माहितीनुसार, पद्मश्री गणेश्वर द्रविड शास्त्री यांच्यामार्फत पूजा करून शस्त्रातील तत्त्व आणि शक्ती तलवारीमध्ये टाकल्याचा पुजाऱ्यांचा दावा आहे. तसेच होम हवन करून तुळजाभवानीची शक्ती ही तलवारीमध्ये काढून घेतल्याचे हि पुजाऱ्यांचे म्हणणे आहे. भक्तांना दर्शन घेण्यासाठी, गहाळ झालेली तलवार तुळजाभवानी देवीजवळ किंवा मंदिरात कुठेही ठेवावी, अशी मागणी आता पुजाऱ्यांकडून करण्यात येत आहे. तर श्री तुळजाभवानीच्या पुजाऱ्याला माहिती न देता गणेश्वर द्रविड शास्त्रीच्या मार्फत मंदिर संस्थांनी होम हवन विधी केल्याचा आरोप पुजाऱ्यांकडून करण्यात आला आहे. तर श्री तुळजाभवानीच्या खजिना खोलीतील गायब झालेली तलवार तात्काळ तुळजाभवानीच्या जवळ आणून ठेवण्याची पुजाऱ्यांची मागणी असताना तलवारी बाबत माहिती घेऊन सांगतो म्हणत मंदिर संस्थानने सावध भूमिका घेतली आहे. त्यामुळे या प्रकरणी आता मंदिर प्रशासन नेमकी काय भूमिका घेतं, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# खळबळजनक! अयोध्येतील श्रीराम मंदिर उडवण्याचा कट?

## बीडच्या तरुणाला थेट पाकिस्तानातून मेसेज

बीड । प्रतिनिधी

अयोध्येतील श्रीराम मंदिर उडवून देण्याचा मेसेज बीडच्या एका तरुणाला थेट पाकिस्तानातून आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात शिरूर कासार पोलीस ठाण्यात तरुणाने तक्रार देखील दिली. या तरुणाला मंदिर उडवण्यासाठी १ लाख रुपयांची ऑफर देण्यात आली असून, कटात सहभागी होण्यासाठी आणखी ५० लोकांची आवश्यकता असल्याचेही मेसेजमध्ये नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



या तरुणाने शिरूर कासार पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक मेसेज आला. या मेसेजमध्ये अयोध्येतील श्रीराम मंदिर आरडीएक्सने उडवून देण्याची धमकी दिली. आपण पाकिस्तानी आहोत हे पटवून देण्यासाठी संशयीने कराचीतील लोकेशनही तरुणाला पाठवले. शिवाय कटात सहभागी होण्यासाठी ▶▶ पान २ वर...

# कृषी खात्याच्या अदला-बदलीवर पंकजा मुडे म्हणाल्या मी फक्त माझ्या खात्याकडेच बघते

मुंबई । प्रतिनिधी

विधिमंडळात रमी खेळल्यावरुन वादात सापडलेल्या अॅड. माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून घेण्यात आले आहे. तर यापूर्वीचे कृषीमंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपांवरुन वादाच्या भोवऱ्यात सापडल्यावरुन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांना पत्रकारांनी प्रश्न केला असता, त्यांनी यासंदर्भात बोलणं टाळलं. 'मी फक्त माझ्या खात्याकडेच बघते' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.



क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे आयोजित 'एअरोनॉमिक्स २०२५' या मोहिमेच्या उद्घाटनासाठी पंकजा मुंडे नाशिकमध्ये आल्या होत्या. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी मंत्री पंकजा मुंडे यांना कृषी खात्यात झाल्याल्या अदलाबदलीविषयी विचारणा केली. तसेच कृषीमंत्री सातत्याने वादात सापडत असल्याचे विचारले असता, असे विषय मी मांडत नाही असं त्या म्हणाल्या. तसेच मंत्री असल्यामुळे कुणी अडचणीत सापडतं असं मला वाटत नाही. त्यामुळे असे म्हणणे योग्य होणार नाही. मी त्याकडे बघतच नाही. मी फक्त माझ्या खात्याकडेच बघते असं उत्तर देत त्यांनी याविषयावर अधिक बोलणं टाळलं.

दरम्यान एअरोनॉमिक्स कार्यक्रमावेळी आयोजकांतर्फे मंत्री पंकजा मुंडे यांना नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे ब्रॅन्ड अॅम्बॅसिडर व्हावे, अशी विनंती करण्यात आली. मुंडे यांनी तोच धागा पकडत आपल्या भाषणात कोणत्या प्रकारची ब्रॅन्ड अॅम्बॅसिडर होऊ असा प्रश्न आयोजकांना केला. आता मी राजकीय कपडे ▶▶ पान २ वर...

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त डॉ.क्षीरसागर दांपत्याकडून अभिवादन



बीड । प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिवादन केले.

शहरातील अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी नगरसेवक गणेश वाघमारे, विनोद हातागळे, गोपाळ धांडे, अमोल पौळ, स्वप्नील हातागळे, प्रकाश कानगावकर, अमर विद्यागार, नाना मस्के, संगीताताई वाघमारे, मुन्ना गायकवाड, संजय वाघमारे, पांडुरंग सुतार, विशाल मोरे आदी उपस्थित होते. तसेच, कल्पतरूच्या सचिव

# जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका-ठाकरे

पनवेल । प्रतिनिधी

विकत घेता येणारी माणसे अशी प्रतिमा आपली महाराष्ट्राबाहेर उभी करण्यात येत आहे. मराठी माणसं विकाऊ आहे असं सांगितले जाते त्याची लाज वाटते. महाराष्ट्रात आपण आपली भाषा विसरतोय, आपली तत्वे घालवतोय, जमिनी घालवतोय. स्वाभिमानी माणसे विकली गेली तर जिवंत प्रेते उरतात. देशाला दिशा देणारा हा महाराष्ट्र आहे. तुम्ही मोठे झाले पाहिजे, पण महाराष्ट्र विकून नाही. इतरांच्या आहारी जाऊन जमिनी देऊन टाकायच्या, बाहेरची माणसे येतायेत. जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका अशी कळकळीचं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जनतेला केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.



राज ठाकरे म्हणाले की, शेकापच्या व्यासपीठावर मी दुसऱ्यांदा येतोय. पक्षाचा विचार न करता मराठीचा मुद्दा समजून घेतला पाहिजे. जेव्हा जेव्हा चांगले रस्ते आले आहेत तेव्हा राज्य सरकारचे लक्ष नसेल तर तो प्रदेश बर्बाद व्हायला वेळ लागत नाही. महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री महाराष्ट्रात लहान मुलांना हिंदी कशी आणता येईल, शिकवता येईल याचा विचार करतोय. महाराष्ट्रात कामधंदा करायला जे येतायेत त्यांना मराठी कशी येईल याचा विचार करत नाही. महाराष्ट्रातला मराठी माणूस, भूमिपूत्र याचा विचारच राज्य सरकारला नाही. याचे भीषण वास्तव रायगड जिल्ह्यात आहे. रायगडातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी चालल्या आहेत. कुठे चालल्यात माहिती नाही. जमिनीचे व्यवहार करणारे आपलेच, कुंपनच शेत खातायेत. उद्योगधंदे इथे येतायेत आणि लोक बाहेरून आणले जातील. शेतकरी आणि कामगार दोन्ही उद्ध्वस्त होतोय. रायगड जिल्ह्याची जबाबदारी जयंत पाटील यांनी हाती घेतली पाहिजे. इथला मराठी माणूस, इथला शेतकरी, उद्योगधंदे यावर मराठी माणसाने लक्ष ठेवणे ▶▶ पान २ वर...

# लोकशाहिरांच्या विचारांचा जागर, ना.पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

परळी वैजनाथ : साहित्याच्या माध्यमातून समाजात क्रांतीची ज्योत पेटवणारे, उपेक्षितांच्या वेदनांना शब्दांतून वाचा फोडणारे महान विभूती, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज भारतीय जनता पार्टीच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात मोठ्या उत्साहात आणि आदराने साजरी करण्यात आली. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजप शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, ''अण्णाभाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते सर्वसामान्यांच्या संघर्षाचा बुलंद आवाज होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, शिक्षणाचे कोणतेही पाठबळ नसताना त्यांनी आपल्या लेखणीतून समाजातील विषमतेवर आणि अन्यायावर कोरडे ओढले. ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर दलितांच्या आणि कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे हा त्यांचा विचार आजही तितकाच प्रेरणादायी आणि क्रांतीकारक आहे. त्यांचे जीवन आणि साहित्य हे आम्हा सर्वांसाठी ऊर्जेचा स्रोत आहे.'' सौ. समशेट्टी यांनी पुढे सांगितले की, अण्णाभाऊंनी आपल्या कथा, कादंबऱ्या आणि पोवाड्यांमधून श्रमिकांचे, वंचितांचे दुःख जगासमोर मांडले आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा दिला. त्यांचे कार्य हे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील एक मैलाचा दगड आहे. यावेळी भाजपचे युवा नेते मुरलीधर पारवे यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमयी जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमास मा.ना.पंकजाताई मुंडे यांचे स्वीय सहायक पी.के.बडे, राजेंद्र ओझा, उमेश खाडे, अश्विन मोगरकर, सुशिल हरंगुळे, बंडू नाना कोरे, राहुल घोबाळे, वर्षाताई जोशी, चंदाताई ठोंबरे, प्रशांत कराड, विजय दहिवाळ, गोपी कांगणे, श्रीपाद शिंदे, महादेव कंडुकटले, वैजनाथ रेकने, मुरलीधर पारवे, उमेश निळे, अच्युत जोगदंड, दिलीप नेहरकर, अनिस शेख, पवन तोडकरी, संदीपान तांबे, विलास पारवे, सुरेश खराटे, कृष्ण बेदरकर, मिलिंद कांबळे, दत्ता क्षीरसागर, रमेश पारदे, राजाभाऊ मुंडे यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी, नगरसेवक, युवा मोर्चाचे कार्यकर्ते आणि महिला आघाडीच्या सदस्यांसह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून लोकशाहिरांच्या स्मृतीस वंदन केले आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

## विचारवंत संस्थेमध्ये साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी; अण्णाभाऊ साठे महाराष्ट्राच्या मातीचा बुलंद आवाज - प्रा.प्रशांत पंडित

बीड : शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेल्या विचारवंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सभागृहामध्ये साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून विचारवंत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख प्रा.प्रशांत पंडित उपस्थित होते.प्रथम त्यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने प्रा.प्रशांत पंडित यांचा सत्कार करण्यात आला. दिनांक २३ जुलै २०२५ ते ३१ जुलै २०२५ पर्यंत चालू असलेल्या व्याख्यानमालेचा समारोप ही या दिवशी करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमाप्रसंगी प्रा.प्रशांत पंडित आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये बोलत असताना ते म्हणाले की आज आपण सर्वजण अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त एकत्र जमलो आहोत. व्यासपिठावरील सर्व मान्यवर, व्यासपीठाच्या समोर उपस्थित सर्व मान्यवर सर्वांच मनापासून प्रथमता स्वागत करतो आणि सर्वांना या जयंतीच्या हार्दिक अशा शुभेच्छा देतो.देश के लिए जिन्होनें विलाश को ठुकराया था गिरे हुए को जिन्होने स्वाभिमान सिखाया था जिसने हम सबको तूफानों से टकराना सिखाया था देश का वो था अनमोल दिपक जो अण्णाभाऊ साठे कहलाया था या ओळींप्रमाणे अण्णाभाऊ एक महान व्यक्तिमत्व होतं. १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्हयातील वाळवे तालुक्यातील वाटेगाव या ठिकाणी त्यांचा जन्म झाला. सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि चंद्राप्रमाणे ओजस्वी व्यक्तिमत्व होते. वडिल भाऊराव सिध्दोजी, आई वालुबाई यांचे मोलाचे संस्कार त्यांना मिळाले अण्णाभाऊ केवळ दिड दिवसांची शाळा शिकले. कारण अस्पृश्य समाजात जन्मलेल्या व्यक्तिला त्या काळात भेदभावामुळे शिक्षण घेता आले नाही. खरं तर त्यांच मुळ नाव तुकाराम होतं. त्याचप्रमाणे त्यांनी त्यांच्या लेखनीतून आणि पोवाडयाच्या माध्यमातून कार्ये केली. ज्याप्रमाणे जिजामाईनी शिवरायांना रामायण, महाभारत, यांच्या कथा सांगितल्या त्याचप्रमाणे वालुबाईनी आण्णाभाऊंना फकिरा लहुजी वस्ताद, वीर सत्तु, पिराजी यांच्या कथा सांगितल्या.चांगले संस्कार दिले. त्यामुळे पुढे जावून अण्णाभाऊ मोठे कांदबरीकार झाले. माझी मैना गावाकडे राहिली, फकिरा वारणेचा वाघ, माकडेची माळ, मास्तर यासारख्या कांदब-या त्यांनी लिहिल्या खरंतर कोणतेही शिक्षण न घेता समाजतल्या प्रत्येक व्यक्तिला आदर व सन्मान वाटेल असं फार मोठं कार्य त्यांनी केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवेल. पण माणूस म्हणून जगण्याचा प्रश्न शिल्लक राहतो. आणि मला भाकरीपेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे. या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले होते. अण्णाभाऊंनी आयुष्यात दोन गोष्टींचा तिरस्कार केला. एक म्हणजे श्रीमंत लोकांकडून होणारे गरीबांचे शोषण आणि अस्पृश्य बांधवांची होणारी आर्थिक आणि सामाजिक पिळवणूक यांना विरोध केला. आज आपण सर्वांनी या जयंतीनिमित्त अण्णाभाऊंचे आचार-विचार घेतले पाहिजेत, ते इतरांना सांगितले पाहिजेत. तरच ही जयंती साजरी केल्याच सार्थक होईल.असे प्रतिपादन प्रा.पंडित यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी प्रल्हाद वाघमारे, पांडुरंग पंडित, दिलीप वाघमारे, किशोर पंडित, कुणाल जाधव, अमोल पंडित, यांच्या सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली

बीड प्रतिनिधी : सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाहीर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे हे मराठी भाषेला पडलेले एक गोड स्वप्न आहे. अण्णाभाऊ हे गिरणी कामगारांचे सक्रीय नेते होते.त्यांनी आपल्या साहित्यात उपेक्षितांचे जीवन रेखाटण्याचे काम केले. त्यांनी एकूण ३५ कादंबर्या, १९ कथासंग्रह , वगनाट्य, लावण्या असे मौलिक साहित्य निर्माण केले. त्यांच्या बर्याच कादंबरीवर मराठी चित्रपट निर्माण झालेले आहेत. अण्णाभाऊंची फकीरा ही कादंबरी राष्ट्रपती पारितोषिक विजेती असून त्यांनी ही कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दमदार लेखणीस अर्पण केलेली आहे. अण्णाभाऊंचे साहित्य सर्वप्रथम रशियन भाषेमध्ये भाषांतरीत झालेले आहे. अण्णाभाऊ सर्व भारताला माहिती होण्या अगोदर ते रशियाला माहिती झाले होते. कारण त्यांनी लेणीण ग्राडचा पोवाडा लिहून अजरामर केलेला आहे.अण्णाभाऊ हे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये अग्रेसर राहिलेले आहेत. या लढयामध्ये त्यांची सर्व प्रसिध्द झालेली लावणी माझी मैना गावाकडे राहिली, माझ्या जिवाची होतीय काहिली ही प्रसिध्द झाली. अण्णाभाऊ उत्तरकाळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराकडे झुकलेले दिसत आहेत.म्हणून ते म्हणतात जग बदल घालून घाव, मज सांगून गेले भिमराव असे प्रतिपादन प्रा.जयंत साठे यांनी आपल्या मुखभाषणात जयंती प्रसंगी केले. या नंतर प्रा.सुरेश थोरात यांनी अण्णाभाऊची सुंदर झक्कड गायली. यावेळी प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर अध्यक्षीय स्थानावरून बोलताना म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांनी बहुजन समाजातील पिडीत समस्या यांना आपल्या साहित्यातून केंद्र बिंदू मानून दाहक सामाजिक अवस्थेचे वास्तव चित्रण साहित्यातून केले. त्यांच्या अनेक कथा कादंबर्यांचे देशी विदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले. शाहीर,कथाकार, कादंबरीकार, नाटककार म्हणून ते प्रसिध्द होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिष्यत्व त्यांनी स्वीकारले होते.दैववाद व अंधश्रध्दा यावर त्यांनी प्रहार केला. समाज परिवर्तनाचे मोलाचे कार्य त्यांनी केले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस. कमवि उपप्राचार्य डॉ.एन.आर.काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालींदर कोळेकर आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रदीप साळूंके यांनी केले तर आभार प्रा.डॉ.रामनाथ वाढे यांनी केले.यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होत

## बीड नगर परिषदेतील सवच्छतेत तीन तेरा लवकरात लवकर स्वच्छता करा व्यापारी आक्रमक बीड नगर परिषद मुख्य अधिकारी यांना निवेदन

बीड प्रतिनिधी : नगर परिषद हद्दितील आठवडी बाजार भाग, मोमीनपूरा मुख्य रस्ता, नवीन भाजी मंडई परिसर, राजीवगांधी चौक परिसर, नगर नाका मच्छि मार्केट परिसर व पालवन चौक मधील परिसर व्यापारी वर्गा करिता स्वच्छ करा आम्ही बीड नगर परिषद हद्दीतील दैनंदिन व आठवडी बाजार मधील व्यापारी असून आमच्याकडून ठेकेदार मार्फत कर म्हणून १० व २० रुपये प्रमाणे घेतले जात असून ते आम्ही देत आहोत. आमचेकडुन कर घेतले जात असतांना आम्ही ज्या जागी आठवडी बाजार, नवीन भाजी मंडई, पालवन चौक, मोमीनपुरा या भागामध्ये बसतो त्याजागी आपले कार्यालयच्या स्वच्छता कर्मचाऱ्याकडुन स्वच्छता केली जात नसल्यामुळे आम्हाला घाणीवर बसून आमचा व्यापार करावा लागत आहे घाणीच्या दुर्गंधीमुळे आम्हाला रोगराईचा धोका निर्माण होत असून भाजी पाला व फळे वर गंभीर स्वरुपाचे जंतू बसत असल्यामुळे आमचे भाजी पाल्यामुळे व फळामुळे जनतेचे आरोग्य पण धोक्यात आले आहे. इतर मागण्यांसाठी बीड नगरपरिषद येथील व्यापारी आक्रमक होऊन मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले निवेदनात म्हटले आहे की व्यापारी म्हंटले आहे कीआमचे आठवडी बाजार दर रविवारी सकाळी पुर्ण पणे स्वच्छ करुन दयावे व आठवडी बाजारामधील मोकाट जनावरे कोंडवाडयामध्ये टाकावे कारण की मोकाट जनावरामुळे बाजारामध्ये चोही कडे शेन पसरलेले दिसत आहे तसेच भाजी मार्केट आतमधील घाण आठवडयात तोन वेळेस करुन दयावे. आपल्या कर्माचाऱ्यांना वेळोवेळी सांगूनही ते पूर्णपणे परिसर स्वच्छ न करता निघून जाते. आठवडी बाजार परिसरमध्ये घाण असल्या कारणाने दाने शे ते तीन शे भाजी पाला विक्रेते सुभाष रोड वर बसून व्यवसाय करीत असल्यामुळे नागरीकांना येणे जाणे साठी रहदारीस अडथळा होत आहे. मुख्याधिकारी यांनी आमचे मागण्या मान्य करावे नसता आम्ही नाइलाजास्तव आपल्या कार्यालयासमोर येणाऱ्या काळात उपोषणाला बसेल अशी आक्रमक भूमिका घेतली

## आदर्श महाविद्यालयात टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

पिंपळनेर : प्रतिनिधी : आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित आदर्श महाविद्यालय पिंपळनेर गणपतीचे ता .जि. बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रहारचे संपादक अशोक होळकर व बाभुळवाडीचे सामाजिक कार्यकर्ते अमोल सातपुते उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बाळासाहेब भांडवलकर उपस्थित होते. मान्यवरांनी सर्वप्रथम लोकमान्य टिळक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून कार्यक्रमाचे प्रतिमा पूजन केले.



यावेळी श्री अशोक होळकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बाळासाहेब भांडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. यावेळी महाविद्यालयात प्रा सतिश नेवडे, श्री अजिज सय्यद, श्री कल्याण सिरसट, श्री बालासाहेब शिंदे, बाबु इतापे, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी परिवर्तनवादी साहित्यिक जीवनदृष्टीचा विद्यार्थ्यांना साक्षात्कार

बीड प्रतिनिधी

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे आणि उपप्राचार्य प्रा.डॉ. शिवाजी मोरे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमात विद्यार्थिनी उत्कर्षा हिंगे हिने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची तरुण पिढीसाठी असलेली प्रेरणादायी बाजू उलगडून दाखवली. विशेष वक्ते म्हणून प्रा.डॉ. राजीव काळे यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, अण्णाभाऊ साठे हे केवळ भूकेची व अब्रूची कथा सांगणारे नव्हते, तर ते बहुजनांच्या इतिहासाची गौरवगाथा लिहिणारे परिवर्तनवादी साहित्यिक होते. त्यांच्या लेखनात विज्ञानवाद, वास्तववाद आणि मानवतावाद यांचा सुरेख मिलाप असून समता मुलुख समाजनिर्मिती ही त्यांची वैश्विक भूमिका होती. त्यांचे साहित्य महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे ठरले आहे, असे मत त्यांनी मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.मनोजकुमार नवशे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कनिष्ठ विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.राजाभाऊ नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्युत सहाय्यकपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

वंजारवाडी (ता. बीड) : गावातील सहा विद्यार्थ्यांची नुकतीच विद्युत सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. गावचे सरपंच मा. श्री. वैजिनाथ (नाना) तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी सरपंच नाना म्हणाले की, ''शिकण्याची जिद्द असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला माझ्याकडून सर्वतोपरी मदत केली जाईल. अगदी गरिबातला गरीब मुलगाही मोठ्या पदावर पोहोचावा, हीच माझी इच्छा आहे. आता उर्वरित आयुष्य केवळ गावाच्या सेवेसाठी अर्पण करणार आहे.'' छोट्यास्या असणार्या वंजारवाडी गावात यापुर्वीच पावनेचारशे नोकरदार आहेत. त्यात या सहा जनाची भर पडली आहे. आपले उपक्रम यशस्वी होत आहेत. आपल्या गावातील मुल नोकरीला लागत आहेत. याचा मला मनस्वी आनंद होत आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. यात अनुक्रमे मोहन महादेव कुटे, कृष्णा संतराम मोराळे, प्रदीप साहिनाथ खाडे, शुभांगी विठ्ठल खाडे, विजय सोपान वनवे, उमेश अर्जुन शेंडगे या सर्वांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला लक्ष्मण पवारसाहेब, महादेव कुटे, पांडुरंग नाना राख, नवनाथ तांदळे फौजी, विठ्ठल आप्पा, गणेश तांदळे, संजय तांदळे, आचन महाराज, गजानन तांदळे, बाबासाहेब तांदळे, सुग्रिव तांदळे, बाबासाहेब चव्हान, सुभाष झाझुंर्णे, नागनाथ सातपुते, लक्ष्मण पवळ, मुकेश पवळ, तात्याराम बाप्पु, शिवाजी कुटे, महादेव कुर्लेकर, अशोक धुरंधरे, ज्ञानोबा कुटे, ज्ञानेश्वर मोराळे, राजेश तांदळे, महादेव तांदळे, चंद्रहास कुटे, विश्वनाथ तांदळे, अवी कुटे, बाळु कुटे, विजय तांदळे यासह गावातील पुरुष, महिलावर्ग, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभाने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नविण मुलांमध्ये स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लोमेश तांदळे सर यांणी केले.

# वैद्यनाथ बँक संचालक मंडळ निवडणूक - २०२५; महाविकास आघाडी प्रणित वैद्यनाथ परिवर्तन पॅनलचा शनिवारी प्रचार शुभारंभ

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

महाराष्ट्रात नामांकित अर्थसंस्था म्हणून नावाजल्या जाणाऱ्या वैद्यनाथ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाचा निवडणूक कार्यक्रम सुरू आहे. महायुतीच्या ताब्यातील या संस्थेची निवडणूक सुरुवातीला बिनविरोध होईल असे वाटत असतानाच महाविकास आघाडीकडून तीन उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने एकूण १३ जागांसाठी निवडणूक लागली आहे. आघाडी प्रणित वैद्यनाथ परिवर्तन पॅनलचा प्रचार शुभारंभ शनिवार, दिनांक ०२ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. हनुमान मंदिर, मोंढा मार्केट, परळी वैजनाथ येथे सकाळी ठिक ११ वाजता प्रचार शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पॅनलच्या प्रचार समितीकडून देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर असे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ श्रीराम फड, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे व वैजनाथ धमपलवार या तिघांनी वैद्यनाथ बँक संचालक मंडळ निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले असून वैद्यनाथ परिवर्तन पॅनलची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्या प्रचाराचा शनिवार, दिनांक ०२ ऑगस्ट रोजी हनुमान मंदिर मोंढा मार्केट येथे सकाळी ठिक ११ वाजता प्रचार शुभारंभ करण्यात येणार आहे. या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमास महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांच्या कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शहराध्यक्ष ॲड.जिवनराव देशमुख, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे, शहराध्यक्ष बहादुरभाई, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड पांडुरंग राठोड, शेतकरी कामगार पक्षाचे तालुकाध्यक्ष सुमंत उंबरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, शहराध्यक्ष सय्यद फिरोज यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांच्या नेत्यांनी केले आहे.

*सभासदाच्या सर्वांगीण विकासासाठी निवडणुकीच्या मैदानात - राजेभाऊ फड*

वैद्यनाथ सहकारी बँक ही महत्त्वाची आर्थिक संस्था म्हणून नावाजलेली आर्थिक संस्था आहे. सभासदांच्या हितासाठी असलेल्या या आर्थिक संस्थेचा वापर मात्र काही नेत्यांकडून राजकीय स्वार्थासाठी केला जातोय हे दुर्दैव आहे. हजारो सभासद बँकेसोबत जोडले गेलेले असताना त्यांच्या हिताचा विचार मात्र कोणीच करतांना दिसत नाही. हे चित्र आता बदलावे लागणार असून, सभासदांचे हित जोपासण्यासाठी संचालक मंडळ निवडणूक आम्ही लढवत आहोत. सभासदांच्या पाठबळावरच आम्ही त्यांच्या हितासाठी संघर्ष करत राहू असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ श्रीराम फड यांनी म्हटले आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५






# शिक्षकांनी केलेल्या योग्य संस्कारामुळे भावी पिढी आदर्श घडते - बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये योग्य पद्धतीचा कायापालट करण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांनी बालपणापासून विद्यार्थ्यांवर केलेल्या योग्य संस्कारामुळे भावी पिढी ही आदर्श घडते. शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या प्रत्येक शिक्षक प्रामाणिकपणे ग्रामीण भागातील विद्यार्थी घडवण्याचे काम करतो याचा अभिमान वाटतो. अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे हे दोघेही सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या प्रति विद्यार्थ्यांच्या मनात किती आदर आहे हे पाहून मीही भारावलो असे गौरवोद्गार शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी व्यक्त केले.

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी या शाळेतील शिक्षक अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमास माजी सभापती पंढरीनाथ लगड, युवा नेते यशराज पंडित, चंद्रकांत शिंदे, सरपंच कैलास माने, माजी सरपंच भाऊसाहेब माखले, कैलास शिंदे, छत्रभुज नाईकवाडे, प्रकाश भोले, उपसरपंच पिंटू चव्हाण, प्रशासकीय अधिकारी प्रमोद देसले, मुख्याध्यापक जुगदार, इंजिनीयर कृष्णकुमार मेंढे, मुकुंद घाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सेवानिवृत्त शिक्षक अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे या दोघांचाही महावस्त्र देऊन सपत्नीक सत्कार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी



अर्जुन धुमाळ, महादेव डोंगरे यांचा हृदयसत्कार

बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना आपल्याच गावामध्ये शिक्षण मिळावे या उद्देशाने शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या अध्यक्षा सौ गिरीका पंडित यांनी ७ शाळा आणि एक महाविद्यालय सुरू केले. या शाळांमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या विभागात उच्चपदस्थ अधिकारी व कर्मचारी म्हणून काम करत आहेत. शिक्षणासोबत कला आणि क्रीडाचेही शिक्षण मिळाले पाहिजे हा उद्देश संस्थेने ठेवून मुला- मुलींना योग्य प्रशिक्षण दिले. त्यामुळे या दोन्ही क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थी झळकताना दिसतात. यामध्ये सर्व शिक्षकांचे मोठे योगदान आहे. आज अर्जुन धुमाळ आणि महादेव डोंगरे हे दोन्ही शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत मात्र विद्यार्थ्यांसोबत त्यांचे जुळलेले नाते पाहून मलाही अभिमान वाटला. यापुढेही त्यांनी विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन करण्यासाठी वेळ द्यावा असे सांगून दोघांनाही भावी आयुष्य सुखी, समाधानी त्यासोबत निरोगी दीर्घायुष्य मिळो अशा शुभेच्छाही बदामराव पंडित यांनी दिल्या.याप्रसंगी ताराचंद शेजुळ, बंडू डोंगरे, बळीराम कोठुळे, सोमनाथ धुमाळ, सुधाकर माळवे, प्राध्यापक चव्हाण, डॉ सुभाष ढाकणे, कृष्णा महाराज डोंगरे, भागवत गवंडी, शिवाजी धुमाळ, नारायण नाटकर, तात्यासाहेब शेळके, रमेश डोंगरे, उद्धव डोंगरे, नामदेव धुमाळ, सतीश देशमुख, शहादेव डोंगरे, आत्माराम गवारे, केशव डोंगरे, बाळराजे तळेकर, किशोर वाघमारे आदींसह संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक केशव तळेकर यांनी केले. सूत्रसंचालन दादाभाऊ उगलमुगले, किसान बांगर यांनी तर आभार प्रदर्शन बाबासाहेब ढाकणे यांनी केले.



संघर्ष योद्धा, मराठा आरक्षणाचे जनक मा. श्री. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आपल्या नागापूर बुद्रुक च्या शाळेत शालेय साहित्य वाटप केले.

## गुरु आऊटडोअर्स इंडियाच्या कायदेशीर सल्लागार पदी ॲड.अक्षय मुळे

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

गुरु आऊटडोअर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या जाहिरात क्षेत्रातील



आघाडीच्या कंपनीने आज ॲड. अक्षय विश्वंभर मुळे यांची कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. याबाबतचा औपचारिक करार आज दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी करण्यात आला आहे.

या करारानुसार, ऑड. मुळे हे कंपनीसाठी विविध कायदेशीर सेवा प्रदान करणार असून, करारनाम्यांचे ड्राफ्टिंग, कायदेशीर सल्ला, न्यायालयीन व प्रशासकीय कामकाजात प्रतिनिधित्व आदी जबाबदार्‍या पार पाडणार आहेत. कंपनीने व्यवसायातील गोपनीयता व हितरक्षणासाठी कडक अटी ठरवल्या आहेत.तसेच सर्व अधिकृत संवाद फक्त लिखित स्वरूपात (ई-मेल किंवा पत्राद्वारे) होणार आहे. या करारामुळे कंपनीला व्यावसायिक गोपनीयतेचे संरक्षण व कायदेशीर बाबतीत सक्षम मदत मिळणार आहे. ॲड. मुळे हे बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ असून, त्यांनी विविध न्यायालयीन प्रकरणांत यशस्वी कामगिरी बजावली आहे.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबवल्या जाणाऱ्या सेवा पंधरवड्यात पाटेगाव येथे शालेय साहित्य व वृक्ष लगवाड़

बीड । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत पाटेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन बऱ्हाणपूरचे उपसरपंच गणेश लांडे यांनी केले होते. सामाजिक क्षेत्रात सक्रीय असलेल्या लांडे यांनी ग्रामपातळीवर उपयुक्त उपक्रम राबवत पंकजाताईंच्या कार्यप्रेरणेचा जागर घडवला. कार्यक्रमाला गोरख



कदम, परमेश्वर कदम, हरिभाऊ कदम, आकाश कदम, गोकुळ कदम, सुदाम अनिल, आबासाहेब आठवले, सुदाम तात्या कदम, बापू डोळस, गोविंद कदम, महेश कदम तसेच शाळेचे मुख्याध्यापक मुंडे सर व कुलते सर यांची उपस्थिती लाभली होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून पालक व ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंनी भारतीय साहित्याला नवा मार्ग दाखविला -प्राचार्य केशव भांगे

शिरूर (का.)प्रतिनिधी

दि.०१ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' यांची जयंती व 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य सन्माननीय केशव भांगे साहेब यांच्या हस्ते,'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांच्या प्रतिमेला



पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी अध्यक्षीय भाषणातून,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा १ ऑगस्ट हा जन्मदिवस म्हणजे एका क्रांतिकारी साहित्यिकाचा जन्मदिवस होय.खरे तर अण्णाभाऊंनी आपल्या लेखनीतून ''भारतीय साहित्यविश्वाला एक नवा मार्ग दाखविला. त्यांच्या लेखनीने लाखो श्रमिक,कष्टकरी,मजूर ऊपेक्षित व वंचितांच्या दु:खाला वाचा फोडली.त्यांची लेखणी एक कलाकृती नव्हती,



साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिवादन केले, मीराताई नवले सोबत रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, राजाभाऊ हुरकुडे सह आदी.

# मराठा आरक्षणासंदर्भात मंत्रीमंडळ उपसमितीची तातडीने स्थापना करण्यात यावी

### विश्व मराठा संघाची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

पुणे / मुंबई, । प्रतिनिधी

विश्व मराठा संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हनुमंत तांगडे पाटील यांनी आज मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्याकडे एक महत्त्वाची मागणी केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मराठा, मराठाकुणबी, कुणबीमराठा आणि कुणबी या घटकांचे आरक्षण, शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, कर्ज व्याज परतावा अनुदान, जात प्रमाणपत्र पडताळणी, इतर दाखले अशा अनेक विषयांवर ठोस निर्णय घेण्यासाठी तातडीने मंत्रीमंडळ उपसमितीची स्थापना करणे अत्यावश्यक आहे.



मार्गदर्शक तत्वांतर्गत सध्या (मराठा) आरक्षणावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, ती १८ जुलै २०२५ पासून नियमितपणे घेतली जात आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी स्तरावर एक प्रभावी समन्वय यंत्रणा नसणे ही गंभीर बाब आहे, असेही तांगडे पाटील यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले की, ''पूर्वीच्या सरकारांमध्ये अशा उपसमित्या नेमण्यात आल्या होत्या, मात्र सध्याच्या सरकारकडून अद्याप अशी कोणतीही समिती नियुक्त करण्यात आलेली नाही. त्यामुळे महत्त्वाच्या निर्णयांकडे कोणीच गांभीर्याने पाहताना दिसत नाही. प्रशासनाच्या एका अधिकाऱ्यावर संपूर्ण जबाबदारी देणे ही मराठा समाजासोबत अन्यायकारक भूमिका आहे.''शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक न्याय मिळवण्यासाठी शासनाने ह्या मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे व मंत्रीमंडळ उपसमितीची नेमणूक करून संपूर्ण प्रक्रियेला अधिकृतता, गती व दिशा द्यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

# सरकारने गोहत्ये प्रमाणेच शेळी आणि कोंबड्यांची हत्या देखील बंद करावी

मुंबई प्रतिनिधी

सरकारने गोहत्ये प्रमाणेच शेळी,मेंढी,कोंबड्या आणि अन्य कोणत्याही जिवाची हत्या देखील बंद करण्या बाबत कठोर कायदा लागू करून त्यांचे जीव देखील वाचवावते अशी मागणी पर्यावरण मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांना रामटेक शासकीय निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन करण्यात आली असल्याचे पत्रकार शेख आयेशा यांनी सांगितले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्रामध्ये गोहत्या बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने मुस्लिम समाजाने मागील काही दिवसापासून आपली कत्तलखाने बंद केलेली आहेत. गोमास विक्री आणि खरेदी बंद असून जनावरांची कत्तल करणे देखील बंद केलेले आहे.आता



पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना आश्रय सेवा केंद्राच्या वतीने निवेदन - पत्रकार शेख आयेशा

महाराष्ट्र सरकारने गोमास हे जसे खरेदी आणि विक्री बंदचा निर्णय घेतला आहे त्याच प्रकारे मांस म्हणून आहारात वापरण्यासाठी शेळी, मेंढी, कोंबड्या, चित्तर आदिंसह काही वन्य प्राणी व पक्षी यांचा देखील सर्रास वापर करत आहेत. त्यांना देखील जीव असल्याने महाराष्ट्र सरकारने गोहत्या प्रमाणेच शेळी, मेंढी, कोंबड्या, चित्तर अथवा अन्य कोणत्याही जीव प्राण्यांची हत्या बंदी करण्याचा निर्णय कायदेशीर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब तसेच महाराष्ट्र सरकारला पर्यावरण मंत्री म्हणून आपण पुढाकार घ्यावा अशी निवेदनाद्वारे प्रत्यक्ष ताईसाहेबांना मुंबई येथील रामटेक शासकीय बंगल्यावर भेट घेऊन मागणी केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी सांगितले.

## जिल्ह्यातील महसूल सप्ताह २०२५ मध्ये ग्राहकांनी सहभाग घ्यावा -अनिल बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाच्या निर्देशनानुसार दिनांक १ ऑगस्ट २५ ते सात ऑगस्ट २५ च्या कालावधीत महसूल सप्ताह साजरा होणार आहे तरी जिल्ह्यातील ग्राहकाने आपली समस्या व प्रश्न साठी सहभाग नोंदवावा असे ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा वतीने करण्यात येते.

महसूल अधिकारी व कर्मचारी वर्गाने ग्राहकाची व शेतकरी ग्राहकाची दैनंदिन जीवनातील जास्तीत जास्त कामे महसूल विभागाकडे असतात तरी दैनंदिन जीवनात ग्राहकांची कामे जलद पारदर्शकपणे, शासनाने दिलेल्या कालावधीत चोख आपले कर्तव्य बजावून ग्राहकाचे



समाधान होईल असे काम करणे आवश्यक आहे.

तसेच महसूल सप्ताह निमित्य बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद कक्षाची निर्मिती होणे आवश्यक आहे त्यामुळे ग्राहकाच्या समस्या मांडणे व सोडविणे सोयीस्कर होईल असे बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

# पालवन मध्ये मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर ,विविध सामाजिक उपक्रम कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पालवण या गावा मध्ये मराठा समाजाचे क्रांतीसुर्य मा.श्री.मनोज (दादा)जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, पालवण या गावातील युवा नेते निखिल(भैय्या)मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ६२.युवकांनी केले रक्तदान. याप्रसंगी वृक्ष लागवड तसेच दंत तपासणी इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. पालवण गावचे युवा नेतृत्व.निखिल मस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालवण गावातील जिल्हा परिषद



आयोजक निखिल मस्के यांचा अभिनव उपक्रम, ६२ युवकांनी केले रक्तदान

शाळेसमोर भव्य रक्तदान शिबिर संपन्न, झाले

बीड शहरातील पालवन या गावात मराठा योद्धा मा.श्री.मनोज(दादा)जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी जिल्ह्यामध्ये सध्या रक्ताचा तुटवडा कमी आहे ,या पार्श्वभूमीवर या युवकांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते, सदरील रक्तदान शिबिर हे पालवण गावचे युवा नेतृत्व.निखिल मस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालवन या गावात जिल्हा परिषद शाळेसमोर भव्य रक्त दान शिबीर ठेवण्यात आले, यावेळी या रक्तदान शिबिराला, उपस्थित सामाजिक कार्यकर्ते, परशुराम(भैय्या)गुरुखुदे, राष्ट्रवादी पक्षाचे.नेते बप्पासाहेब घुगे, मनसे नेते.सोमेश (भाऊ)कदम, सामाजिक कार्यकर्ते .कचचू(आणणा) जगताप, ▶▶ पान २ वर...

# बीड जिल्ह्याच्या विकासात महसुल विभागाचे उल्लेखनीय योगदान -जिल्हाधिकारी जॉन्सन

गेवराई (प्रतिनिधी) दि.०१ ऑगस्ट रोजी राज्यभर साजरा केला जाणा-या महसुल सप्ताहा अतंर्गत महसुल दिन शिवनेरी लॉन्स, ताकडगाव रोड, गेवराई येथे साजरा करण्यात आला. सदर महसुल दिन कार्यक्रमाचे अध्यक्षपदी मा. बीड जिल्हाधिकारी श्री.विवेक जॉन्सन हे होते.कार्यक्रमाचे उदघाटन गेवराईचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर वेळी प्रमुख उपस्थितीथी मा.जितीन रहेमान सो.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड, अप्पर जिल्हाधिकारी श्री. हरिष



गेवराई येथे बीड जिल्हा महसुल दिन संपन्न

धार्मिक सो. उपजिल्हाधिकारी भुसंपादन, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार हे उपस्थित होते. मा. आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी दिप प्रजोलन करुन कार्यक्रमाची सुरवात केली. मा. जिल्हाधिकारी यांनी शिव प्रतिमेचे पुजन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्तविक जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांनी केले.

सदर वेळी सर्व मान्यवरांचे स्वागत बीड उपविभागातील उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता ▶▶ पान २ वर...